माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १५८३/२०२२**

**अपिलार्थी, श्री. अंकुश गजानन मेश्राम**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
तहसिल कार्यालय, भंडारा ता. जि. भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
तहसिल कार्यालय भंडारा, ता. जि. भंडारा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.१०.२०२३**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०२.२०२२ | ०३.०३.२०२२ (हस्तांतरीत) | ०९.०४.२०२२ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांच्याकडे **दिनांक २६.०२.२०२२** रोजी ऑनलाईन माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " श्री. जिवनचंद्र राजाराम निर्वाण यांचे एन.ए. व मंजूर नकाशा कॉपी गट नं. १६८/१ बेला " याविषयी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांनी दिनांक ०३.०३.२०२२ रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय भंडारा यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केलेला आहे व त्याची प्रतिलिपी अपिलार्थीस दिलेली आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०९.०४.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचेकडे "माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमूद करुन ऑनलाईन प्रथम अपील दाखल केले. सदर प्रथम अपील अर्ज सुध्दा प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांनी दिनांक २०.०४.२०२२ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, भंडारा यांचेकडे हस्तांतरीत केलेला आहे व त्याची प्रतिलिपी अपिलार्थीस दिलेली आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे **दिनांक १६.०६.२०२२ रोजी** " माहिती देण्यात आली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १७.०६.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक ११.१०.२०२३ रोजी माहिती अधिकार सप्ताहाचे औचित्य साधून



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

आयोगाकडे प्राप्त भंडारा जिल्हयाशी संबंधित व्दितीय अपीलाची सुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथे आयोजित करण्यात आलेली आहे. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री. जी.यु. सोनकुसरे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्रीमती विनीता लांजेवार उपस्थित आहेत.

अपिलार्थी श्री. मेश्राम यांनी आज दिनांक ११.१०.२०२३ रोजी तहसिलदार भंडारा यांना जोडपत्र-अ मध्ये नमूद माहिती म्हणजेच श्री. जिवनचंद्र राजाराम निर्वाण यांचे एन.ए. व मंजूर नकाशा गट नं. १६८/१ ची माहिती मिळालेली असल्याबाबतची लेखी निवेदन दिलेले आहे. सदर बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांना जोडपत्र-अ प्रमाणे यापूर्वीच माहिती प्राप्त झालेली असल्यामुळे प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.१०.२०२३**

जावक क्रमांक 6851 दिनांक 14 DEC 2023